ISSN: 2348-1390

# NEW MAN

## INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES

VOL. 7 ISSUE 11 NOVEMBER 2020

A REFEREED AND INDEXED E-JOURNAL

IMPACT FACTOR: 4.321 (IIJIF)

*Chief Editor*
**Dr. Kalyan Gangarde,**

*Guest Editor*
**Santoshkumar Patil**

NEW MAN PUBLICATION

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| **Full Journal Title:** | NEW MAN INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES |
| **FREQUENCY:** | MONTHLY |
| **Language:** | ENGLISH, HINDI, MARATHI |
| **Journal Country/Territory:** | INDIA |
| **Publisher:** | New Man Publication |
| **Publisher Address:** | New Man Publication<br>Ramdasnagar, Parbhani -431401<br>Mob.0 9730721393 |
| **Subject Categories:** | LANGUAGES, LITERATURE, HUMANITIES , SOCIAL SCIENCES & OTHER RELATED SUBJECTS |
| **Start Year:** | 2014 |
| **Online ISSN:** | 2348-1390 |
| **Impact Factor:** | **4.321 (IIJIF)** |
| **Indexing:** | Currently the journal is indexed in:<br>Directory of Research Journal Indexing (DRJI),<br>International Impact Factor Services (IIFS)<br>Google Scholar |


NMIJMS DISCLAIMER:

The contents of this web-site are owned by the NMIJMS and are only for academic publication or for the academic use. The content material on NMIJMS web site may be downloaded solely for academic use. No materials may otherwise be copied, modified, published, broadcast or otherwise distributed without the prior written permission of NMIJMS.

Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references and biographies/references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.



Scanned with CamScanner

# Contents


1. AI Machines: A Threat to Human Existence and Society ....
**Kishor R. Thakare / Dr. Vaibhav J. Sabnis**
2. Woman's Empowerment in Developing India
**Dr. Jayshree C. Salunkhe**
3. अटल बिहारी वाजपेयी यांचे राष्ट्रवादा संबंधी योगदानाचे अध्ययन
**प्रा. अनिल काशिनाथ साळुंके / प्रा. डॉ. संभाजी संतोष पाटील**
4. १९९० नंतरच्या समकालिन साहित्य प्रवाहाच्या अनुषंगाने मराठी साहित्यातील समाजाचे प्रतिबिंब
**डॉ. अक्षय किशोर घोरपडे**
5. राष्ट्रसंत तुकडोजीच्या कवितेतील सामाजिक प्रबोधन
**डॉ.रामलीला सुदामराव पवार**
6. गाथासप्तशतीमधील प्रतिबिंबीत समाज
**प्रा. बाळासाहेब गणपाटील**
7. साहित्य रत्न लोकशाही अण्णा भाऊ साठे लिखित 'फकीरा' या कादंबरीतील समाज चित्रण
**बडगुजर गोपाल भगवान**
8. ''पळसचोड' या आदिवासी कांदबरीतील कोकणा जमातीचे समाज दर्शन''
**डॉ.के.एन.सोनवणे / प्रा.मधुचंद्र लक्ष्मण भुसारे**
9. समकालीन मराठी ग्रामीण कादंबरीतील बदलता समाज
**डॉ. शारदा वामन मोरे**
10. उत्तम कांबळे यांच्या कादंबऱ्यातील समकालीनता
**डॉ . राजेंद्र मुंढे**
11. समकालीन प्रवाहातील बदलते ग्रामीण साहित्य
**डॉ. रत्ना जवरास**
12. शिवकालीन सभासद बखरीतील सामाजिक अवस्था
**संदीप भास्कर पाटील**
13. समकालीनतेच्या संदर्भात अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांची आवश्यकता
**डॉ. सुनिल भालेराव पाटील**
14. वनतरी उपन्यास में नारी विमर्श
**डॉ.अशोक डी तायडे**
15. 'यह अंत नहीं' कहानी में दलित जीवन
**डॉ. भगवान बाबुराव भालेराव**
16. समकालीनता के सन्दर्भ में अज्ञेय की कविता में पर्यावरण चिंतन
**अजित चुनिलाल चव्हाण**
17. आदिम जाति पर भूमंडलीकरण का प्रभाव: मरंग गोंडा नीलकंठ हुआ उपन्यास के संदर्भ में
**प्रा. सविता सीताराम तोडमल**




Scanned with CamScanner

11.

# समकालीन प्रवाहातील बदलते ग्रामीण साहित्य

**डॉ. रत्ना जवरास,**
कला आणि विज्ञान महाविद्यालय बोदवड, जि. जळगाव

प्रस्तावना : आधुनिक मराठी साहित्यातील अतिशय महत्त्वाचा प्रकार म्हणून ग्रामीण साहित्य या प्रकाराचा उल्लेख आवर्जून करावा लागतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मराठी साहित्यात जो अमुलाग्र बदल झालेला आहे त्यात ग्रामीण साहित्यातील कथा,कादंबरी, नाटक,एकांकिका,पथनाट्य आणि कविता या सर्वांचा समावेश आपल्याला आधुनिक मराठी साहित्यात करावा लागेल. ग्रामीण साहित्यातील बदलत्या प्रवाहा बरोबर या साहित्याची नोंद आधुनिक मराठी साहित्याने घेतलेली आपल्याला दिसून येईल. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात जे नवनवीन साहित्य प्रवाह जन्मास आले त्यात 1950 ते 1960 या दरम्यान चळवळीतून निर्माण झालेलं साहित्य म्हणून दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य यांनी आपला अवीट ठसा आधुनिक साहित्यावर उमटवलेला आहे.या दोन्ही साहित्याबरोबर स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य,मुस्लिम साहित्य, बालसाहित्य इत्यादी साहित्य प्रवाहाने मराठी साहित्याचे दालन समृद्ध केलेले आहे.यात दलित आणि ग्रामीण साहित्याचा वाटा हा मोलाचा ठरलेला आहे. 1960 नंतरच्या झिरपत्या शिक्षण पद्धतीने शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार ग्रामीण भागातल्या तळागाळापर्यंत झालेला आहे. आणि त्याचाच एक भाग म्हणून नव्याने शिक्षित झालेला तरुण वर्ग लेखणी कडे वळलेला दिसतो. आणि त्यातूनच आजच्या आधुनिक बारोमास,पाडा या सारख्या कादंबऱ्या आजही मराठी साहित्यात आपले पाय घट्ट रोवून एक आरुढ अशा स्थानावर या कादंबऱ्या विराजमान झालेल्या आपल्याला दिसतात. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणात झालेला आपल्याला दिसून येईल.त्यामुळे तळागाळातील ग्रामीण भागातील तरुण नव्याने शिकू लागले होते. ही शिकलेली नवीन पिढी ग्रामीण साहित्य वाचू लागले.तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, या साहित्यात आपला गाव,आपली माणसं, आपला शेती, शिवार, आपली माती, त्यांचा सुख-दुःख, यश-अपयश यांचा दर्शन आपल्याला कुठेही दिसत नाही. म्हणून नव्याने शिकून साहित्याकडे वळलेला तरुण मराठी ग्रामीण साहित्याकडे मोठ्या प्रमाणात वळलेला दिसून येतो. भारत हा कृषीप्रधान देश आहे आणि 75 टक्के भारतातील लोकं हे ग्रामीण कृषी व्यवस्थेवर अवलंबून आहेत. तरीही 75% असलेल्या ग्रामीण समाजाचे चित्रण यांचे जीवन दर्शन आपल्या साहित्यातून होतच नाही. याची जाणीव ग्रामीण तरुणाला पहिल्यांदा या आधुनिक मराठी ग्रामीण साहित्यातून झालेली दिसते. यातूनच पुढे 1960 नंतर ग्रामीण साहित्यात महत्त्वाचे बदल झालेले आपल्याला दिसून येतात. या कालखंडाचा विचार केल्यास या दरम्यान शिकून पुढे आलेल्या तरुण पिढीला परिवर्तनाचे भान होते.आणि ते भान लक्षात ठेवूनच त्यांनी ग्रामीण साहित्य, समाज, समाजाचं चित्रण, समाजाची सुखदुःख,शेती, शिवार,माती, माणसांशी संबधित असलेली सुख-दुःख त्याचं चित्रण मराठी ग्रामीण साहित्यात करायला सुरुवात केली. आणि यातूनच ग्रामीण मराठी कथा, कादंबरी, नाटक,कविता,



Scanned with CamScanner

चरित्र-आत्मचरित्र ग्रामीण लेखकांनी मोठ्या प्रमाणात 1960 नंतर लिहिलेले आपल्याला दिसून येईल.ग्रामीण साहित्य लेखनाची सुरुवात खऱ्या अर्थाने कोणी केली असेल तर ती महात्मा फुलेंनी 1854 मध्ये लिहिलेल्या साहित्याने केली होती. त्यांनी लिहिलेला शेतकऱ्यांचा आसूड, तृतीय रत्न, ब्राह्मणांचे कसब,सार्वजनिक सत्यधर्म, शिवाजींचा पोवाडा,अभंग या ग्रामीण शेतकऱ्यावर आधारित ग्रामीण साहित्य कृतीमध्ये महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांबद्दल, त्यांच्या सुखदुःखात बद्दल, त्यांना नाडणाऱ्या ब्राह्मणांबद्दल, 1854 साली हे सगळं लिहून ठेवलेले आहे. त्यातूनच प्रेरणा घेऊन खऱ्या अर्थाने 1960 नंतर अनेक साहित्यिक ग्रामीण जीवनाचे चित्रण साहित्यातून साकारू लागले.त्यात बी.रघुनाथ, शंकर पाटील,व्यंकटेश माडगूळकर,द. मा. मिरासदार इ.लेखकांनी ग्रामीण साहित्य लिहायला सुरुवात केली.त्यानंतर डॉ. आनंद यादव,उद्धव शेळके, बाबा पाटील, रा.रं. बोराडे,मुकुंद गायकवाड, बंकट पाटील, द.ता. भोसले, चंद्रकुमार नलगे, चारुता सागर,नागनाथ कोतापल्ले, इत्यादी अनेक लेखकांनी ग्रामीण साहित्य प्रवाहात महत्त्वाची कामगिरी बजावलेली आहे. या सर्व लेखकांनी बदलते ग्रामीण खेडे, खेड्यातील ताण तणावग्रस्त जीवन आणि खेड्यातील कृषी व्यवस्था यांचे चित्रण साहित्यातून अनुक्रमे केलेले आहे. याचदरम्यान एकोणीशे ऐंशीच्या कालखंडात शेतकरी संघटनेचा उदय झालेला आहे. आणि या शेतकरी संघटनेचे अध्यक्ष श्री शरद जोशी यांनी शेतकऱ्यांना आव्हान केलं.पुन्हा एकदा शेतकऱ्याच्या मालाला हमीभाव मिळाला पाहिजे, त्याच्या घामाचा दाम त्याला दिला गेला पाहिजे. यासाठी शरद जोशींच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघर्ष करण्यासाठी रस्त्यावर उतरलेला आहे. त्यादरम्यान शेतीच्या भावासाठी आंदोलन, मोर्चा, लॉंग मार्च इत्यादी शेतकरी करू लागला. आणि तेव्हाच खऱ्या अर्थाने ग्रामीण परिवर्तनाला सुरुवात झालेली आहे.ग्रामीण परिवर्तनाला तिच्या विकासाला पोषक असं वातावरण निर्माण होत गेलेलं आपल्याला या आंदोलनाच्या टप्प्यांमधून दिसून येईल.

ग्रामीण साहित्याचा रूप हे मराठी साहित्यापेक्षा आपला वेगळा ठसा उमटवण्यात नेहमीच प्रभावी ठरलेले आहे. हे आपल्याला निश्चितपणे लक्षात घ्यावं लागेल.यात महत्त्वाचं कारण म्हणजे यापूर्वी मराठी साहित्य लिहिणारा लेखक मुख्यतः शहरी आणि महानगरीय भागात वाढलेला मध्यमवर्गीय आणि पांढरपेशा वर्ग होता.ग्रामीण जीवनाशी त्याचा जवळून परिचय नव्हता.त्यामुळे त्यांच्या वांङमय जाणिवा निश्चितपणे विकसित झालेल्या नव्हत्या.अशावेळी ग्रामीण साहित्याचे स्वरूप निश्चित नसल्याकारणाने नवोदित ग्रामीण लेखकही काहीशा संभ्रमावस्थेत होता.हा लेखक नुकताच लिहिता झालेला असल्याने तो मुख्यतः खेड्याच्या मुख्य प्रवाहातील होता. खेड्याच्या खालच्या सामाजिक स्तरातील होता. तो कष्टकरी,गरीब, शेतकरी, शेतमजूर,यासारख्या खालच्या स्तरातील हा लेखक नव्याने लेखणी घेऊन लिहायला सज्ज झालेला होता. त्यामुळे नकळत त्याने आपली गरिबी,आपले दारिद्र, आपले सुख दुःख,शेतमाल हमीभाव, आपली परिस्थिती, शिक्षण, बोलीभाषा, याविषयीचा एक न्यूनगंड त्याच्या मनात होता. आपल्या या जीवघेण्या परिस्थितीचे भयानक वास्तव, परिस्थितीमुळे त्याच्या वाटेला आलेलं भयानक असे दारिद्र,त्या दारिद्र्याच्या जाणिवेचे चटके, खेड्यात येऊ लागलेल्या आधुनिक तांत्रिक बदलांमुळे उध्वस्त होऊ लागलेले त्याचे भावविश्व,त्याचे चित्रण आधुनिक साहित्यातून करण्यास त्याला काहीसा कमीपणा वाटू लागला. आपल्यावर शहरातून



Scanned with CamScanner

टीका होते की काय?आपण शहरातील लोकांचा विनोदाचा टिंगल-टवाळीचा विषय तर होणार नाही ना? तसेच त्याच्या बोलीभाषेची, ग्रामीण भाषेचीही त्याला लाज वाटत होती. अशा या भाषेतून लेखन करायचे का?आपली बोली, ग्रामीण बोली आहे. तिचं प्रदर्शन करणे त्याला कमीपणाचे वाटत होतं. मग पहिल्या पिढीच्या लेखकांचे अनुकरण त्याने करायला सुरुवात केली. 1920 नंतर खेड्याकडे चला या महात्मा गांधींच्या दिलेल्या हाकेने खरा भारत ग्रामीण भागामध्ये आहे. ही जाणीव जेव्हा मराठी ग्रामीण तरुणांना झाली,तेव्हा त्यांनी खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्य, ग्रामीण माणूस,शेतकरी माणूस, त्याची कृषी संस्कृती याला महत्त्वाचे मानायला सुरुवात केली. याचाच अर्थ असा की, ग्रामीण साहित्याची मूळ प्रेरणा हे गांधी वादातूनच स्फूरलेली आपल्याला दिसेल. परंतु यासंदर्भात प्राध्यापक अरविंद वामन कुलकर्णी यांनी केलेले विधान याठिकाणी आपल्याला ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा बद्दल एक वेगळाच मुद्दा लक्षात आणून द्यायला मदत करते. ते म्हणजे, 'शाहू महाराजांच्या चळवळीच्या आणि सत्यशोधक जलसा यांचा परिणाम या ग्रामीण निर्मितीवर झालेला आहे म्हणजे सामाजिक चळवळ ही साहित्याच्या प्रेरणा ठरू शकतात'1.याचाच अर्थ असा की,1920 नंतर खेड्याकडे चला या महात्मा गांधीजींच्या प्रेरणेने किंवा सामाजिक जाणिवेच्या प्रेरणेने ग्रामीण साहित्य निर्माण झालेलं आहे. हे आपल्याला या विधानातून मांडता येते. ग्रामीण साहित्यात विशेषतः गावकुसाबाहेरील माणसांचे,गाव खेड्यातील चित्रणं मोठ्या प्रमाणात उमटलेली आपल्याला दिसून येतात. हे केवळ रुचिपालटासाठी येत नाही.म्हणून आजवर ग्रामीण साहित्याचे चित्रण जे साहित्यामध्ये झालेले आहे ते कल्पनेतील नसून वास्तववादी पातळीवर झालेले आहे.ग्रामीण माणूस वास्तविक पातळीवर जगत असतो.आणि ग्रामीणांचे जगणं हे वास्तववादी पातळीवरच असतं.आणि तेच ग्रामीण लेखन ग्रामीण साहित्यातून मांडत असतो. अशी भूमिका ग्रामीण लेखकांनी स्वीकारल्याचे जाणवते. यासंदर्भात एक महत्त्वाचं विधान मोहन पाटील यांनी केलेले आहे. ते म्हणतात की,' ग्रामीण साहित्याच्या संदर्भात अशी कुठली एकच प्रेरणा सांगता येणं शक्य नसतं तर 'गाव 'हीच ग्रामीण साहित्यामागची खरी प्रेरणा आहे. असं म्हणता येते.'2 ग्रामीण भागातील माणसावर त्याच्या मातीने,त्याच्या संस्कृतीने, त्याच्यावर केलेल्या संस्काराने, तिथला प्रामाणिक अनुभव आणि मातीतली माणसं याविषयी वाटणारा जिव्हाळा, तो ज्या समूहात रहातो जे जगणं, येथील समूहजीवन, त्या समूहात अवतारणारा अंतर्नाद, ग्रामीण साहित्यामध्ये उमटलेला आपल्याला दिसून येतो. ग्रामजीवन हा भारतीय जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. या लोकांच्या अनुभवाला स्वानुभवातून आलेलं वेगळेपण त्यांच्या लेखनातून आविष्कृत झालेले आपल्याला दिसून येते. ते शब्दातून मांडण्याची प्रेरणा त्यांना याच ग्रामीण मातीनेदिलेली आहे.

1960 च्या आसपास नवशिक्षित ग्रामीण तरुणांच्या मनातून नवीन सामाजिक आणि सांस्कृतिक जाणीव,जागृती, अस्मिता, स्वाभिमान निर्माण झालेला आहे. आणि आपण अनुभवलेला गाव, आपला अनुभव, आपले दुःख, आपले दारिद्र्य,आपली गरिबी, आपले उपासमार, हे साहित्याचा विषय होऊ शकतात याची सर्वप्रथम जाणीव या नवतरूण लेखकांना झालेली दिसून येते. ग्रामीण भागात राहून आपल्याला आलेला अनुभव याचे नव्याने चित्रण करायला तो सज्ज झाला. शहरी आणि महानगरीय भेद या विषयाचे चित्रण,निसर्गाविषयी असलेलं प्रेम, शेतीविषयक



Scanned with CamScanner

असलेलं अस्सल चित्रण, शेतीतील काबाडकष्ट करणारे कष्टकरी,आणि या शेतमजूर शेतकऱ्यांनी शेतीविषयक संस्कृती, लोकधारा व त्यातूनच समाज टिकून ठेवण्याचे महत्त्वाचं कार्य ग्रामीण जीवन पद्धतीने सांभाळून ठेवलेले आहे.हे आपल्याला ग्रामीण साहित्याचं वाचन करताना प्रामुख्याने जाणवतं. बदलत्या गावगाड्याचे चित्रण, निसर्ग आणि ग्रामीण माणसांचा अतूट संबंध, त्यातून निर्माण झालेला सामाजिक, वैचारिक असा दृष्टिकोन, ग्रामीण भागातील विविध जाती धर्मातील लोकं यांचे चित्रण,त्यातून निर्माण झालेले वाद-विवाद यांचे चित्रण, ग्रामीण लेखणीतून साकार झालेले आपल्याला दिसते. आधुनिकतेमुळे ग्रामीण जीवनात सामाजिक,आर्थिक,शैक्षणिक,सांस्कृतिक,धार्मिक जीवनात ग्रामीण माणसाची परवड होत आहे. याबद्दल त्यांच्या मानसिकता त्यांचे चित्रण ग्रामीण साहित्यातून करणं हीच ग्रामीण साहित्याची महत्त्वाची प्रेरणा बनलेली आहे. ग्रामीण जीवनाचा मुख्य कणा म्हणजे शेती आणि शेतीशी संबंधित जनावरं,शेतीतं, शेतीला लागणारे अवजारे, पाणी या सगळ्यांचं शेतीची असलेलं अस्सल नातं,गुरंढोरांविषयी असलेले प्रेम, हे सर्व काही ग्रामीण साहित्यात दिसून येत. ग्रामीण जीवन हे शेतीवर उदरनिर्वाह करत असल्याने शेती ही पावसावर अवलंबून आहे. आणि पाऊस कधी जास्त पडतो तर कधी कमी पडतो. यामुळे शेतकऱ्यांची झालेली दयनीय अवस्था, ग्रामीण भागातून प्रकर्षाने निदर्शनास येते. ग्रामीण संस्कृतीमध्ये पूर्वीपासून चालत आलेली रूढी, परंपरा यांचे चित्रण ग्रामीण साहित्यात होताना आपल्याला दिसून येईल.देवावर विश्वास असलेली ही संस्कृती कधीकधी अंधश्रद्धेला ही बळी पडलेली आपल्याला दिसून येईल. ग्रामीण भागामध्ये ज्या पद्धतीने वृक्षांची पूजा केली जाते. तशीच गाईची पूजा केली जाते. सर्पांची देखील पूजा केली जाते.यातूनच ग्रामीण संस्कृती घडत गेलेली दिसेल.

**ग्रामीण साहित्यातील प्रादेशिक भिन्नता :**

डॉ.आनंदा यादव डॉ. नागनाथ कोत्तापल्ले डॉ.द.भि. कुलकर्णी, प्राचार्य म.सु.पाटील इ.समीक्षकांनी ग्रामीण भागातील प्रादेशिकता आणि नवीन सामाजिक दृष्टिकोन या दोन्ही संकल्पना अनेक बाबतीत भिन्न आहेत हे हे सांगितलेले आहेकृषी संस्कृतीचे वेळोवेळी दर्शन आपल्याला ग्रामीण साहित्यात लेखक करताना दिसतात. त्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे डॉ. सदानंद देशमुख लिखित 'बारोमास'ही कादंबरी होय.शेतकरी आत्महत्या आणि त्यांचे उद्ध्वस्त झालेले जीवन याचा भयानक प्रत्यय आपल्याला या कादंबरीमध्ये येतो. यासंदर्भात प्रा.ज्ञानेश्वर भोई आपल्या शोधनिबंधात म्हणतात की ,'या सुशिक्षित बेरोजगारीचा प्रश्न देखील सदानंद देशमुख यांनी हाताळलेला आहे. ग्रामीण कृषी व्यवस्थेची झालेली पडझड या कादंबरीत दाखवण्यात आलेली आहे.ज्या शेतकऱ्यांच्या घरात पूर्वी अन्न धान्याच्या कणग्या भरलेल्या असायच्या त्या शेतकऱ्यांना निसर्गाच्या लहरीपणामुळे व शेतातील नापिकीमुळे आत्महत्या करण्याची वेळ येते याचं चित्रण सदानंद देशमुख रेखाटतात.'3 1990 नंतरच्या ग्रामीण साहित्याच्या निर्मितीचा विचार प्रामुख्याने केला असता मराठी मध्ये मोठ्या प्रमाणात माणसाच्या जाणिवा, त्याच्या संघर्षाचे आणि एकूणच कांता मानवतावादाचे चित्रण ग्रामीण साहित्यामध्ये केलेले आहे. त्याचबरोबर राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पातळीवरही ग्रामीण साहित्य ढवळून निघालेले आहे. असे असले तरी ग्रामीण जीवनात ग्रामीणत्व संपलेले नाही.आणि तेच लेखक ग्रामीण साहित्यात मांडण्याचा प्रयत्न करत असतात. ग्रामीण साहित्यातील गाव-गाडा



Scanned with CamScanner

जातीबद्दल समाजाचा स्वरूपाविषयी येथील कुटुंबव्यवस्था, शेतकरी जीवन, त्यांच्या काळानुसार साहित्यातून सर्वच लेखकांनी मांडणी केलेली आहे.व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, आनंद यादव, विश्वास पाटील, भास्कर चंदनशिवे, इंद्रजित भालेराव या सर्व ग्रामीण साहित्यिकांनी ग्रामीण साहित्याला नवी दिशा देण्याचे कार्य केलेले आहे. याबरोबरच सखा कलाल, बाजीराव पाटील, बाबा पाटील या साहित्यिकांनी देखील ग्रामीण साहित्याचे वास्तवदर्शी चित्रण मांडण्याचा प्रयत्न वेळोवेळी केलेला आहे. एकंदरीतच ग्रामीण साहित्याच्या चळवळीचं स्वरूप बघता ते पूर्णपणे ती तंत्रावर अवलंबून आहे, असंच आपल्याला म्हणावं लागेल ग्रामीण साहित्याच्या चळवळीच्या उभारणीसाठी प्राध्यापक डॉ.रावसाहेब कसबे, डॉ. हातकणंगलेकर, डॉ.वाघमारे यांनी वेळोवेळी चर्चासत्र, शिबिर, कार्यशाळा घेऊन चळवळीला जोमाने उभे करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आणि याच्या आधारे ग्रामपातळीवर वैचारिक वारे वाहू लागले होते. यातून ग्रामीण साहित्याला नवी दिशा मिळत गेली आणि शेतकऱ्यांचे प्रश्न व्यासपीठावर येऊन, त्यांच्या जीवनातील स्थित्यंतर घडवून आणतील अशी अपेक्षा या साहित्याच्या आधारे व्यक्त केली गेली. ग्रामीण साहित्यातील लेखकाने जे वास्तवदर्शी चित्रण अचूकपणे साहित्यात मांडलेले आहे. त्यातूनच ग्रामीण साहित्याची निर्मिती ती सुरू झालेली आहे. विश्वास पाटील यांची पांगिरा, झाडाझडती, रा.रं.बोराडे यांची रहाट, ,पाळणा, अशोक कोळी यांची पाडा असे साहित्य ग्राम जीवनाशी, राजकीय सत्तेशी मिळते-जुळते असणारे आहे. ग्रामीण भागात सतत पाचवीला पुजलेला दुष्काळ याचीही नोंद या बदलत्या साहित्याने घेतलेली आहे. सततच्या दुष्काळामुळे ग्रामीण क्षेत्रात शेतकऱ्यांचा संसार आणि जगण्याची उमेद कशी नष्ट होते. याचेही चित्रण ग्रामीण साहित्यिकांनी केले आहे. त्यांची तत्वनिष्ठ मूल्यांवर आधारित कशी टिकून आहे हे आपल्याला या साहित्यात दिसून येते. ग्रामीण संस्कृतीचा कणा असणाऱ्या भुमिपुत्रावरील अन्याय आणि अत्याचाराची विविध पैलूंची जाणीव त्यांचे साहित्य करून देतात. तसेच ग्रामसंस्कृतीच्या वाताहातीचे चित्रण आपल्याला ग्रामीण साहित्यात होताना दिसते. त्याचबरोबर खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण, या धोरणामुळे उत्पन्न वाढवण्याच्या हेतूमुळे विकास प्रकल्पांच्या नावाखाली भूमिपुत्रांचे विस्थापन करण्यात आले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी धोक्यात आल्या आणि कृषी संस्कृतीवर आघात व्हायला सुरुवात झाली.याचे चित्रण नव्वदोत्तरी ग्रामीण साहित्यामध्य अनेक साहित्यिकांनी कलेले आहे.जागतिकीकरणाच्या व्यापाराचा परिणाम शेतकऱ्यांच्या जीवनावर झालेला आपल्याला दिसून येईल. जागतिकीकरणातील वृत्ती, अर्थप्राप्तीचे स्वार्थ या सर्वांमधून असलेला संघर्ष साहित्यामधून नोंदला गेलेला आहे. शेतीमालाचे मातीमोल भाव, वाढती मजुरी, उत्पादनाचा खर्च,सरकारी अधिकाऱ्यांची मनमानी, भ्रष्ट अधिकारी, आणि दुर्बल शेतकरी, सावकारांच्या पाटा, सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी आंदोलन, त्यांचे यश-अपयश इत्यादी घटकांवर ग्रामीण साहित्यप्रकाशटाकते. ग्रामीण जीवनातील स्त्रीजीवन जे साकारले आहे ते अतिशय मेहनत आणि काबाडकष्टाचे आहे.ती फक्त घरात काम करणारी गृहिणी नसते तर शेतातही पुरुषाच्या बरोबरीने राबणारी आहे. एवढे करूनही तिचे कर्तुत्व मात्र नेहमी झाकले गेलेले आहे.तिला घरात आणि समाजात नेहमी दुय्यम वागणूक आणि स्थान दिले गेलेले आहेत.तिला कोणताही अधिकार नाही किंवा तिला फक्त गृहीत धरले जाते.तरीही कर्तव्यात कसूर न करता तिला मनातील भावनांना नेहमी आवर घालावा लागतो. पण कधीतरी या कोंडमाऱ्यातून ती विद्रोह करताना दिसते.तरीही याकडे कोणाचे लक्ष जात नाही शिक्षणाने समाज जीवनामध्ये ग्रामीण

भागांमध्ये जसं परिवर्तन झालं तसं ग्रामीण जीवनातील स्त्रीच्या बाबतीत मात्र तसे झालेले दिसून येत नाही. तडजोड करण्यापलीकडे तिच्या वाट्याला फारसे काही आलेले नाहीये, असे असले तरी ग्रामीण कृषी जीवन आजही स्त्रियांच्या कष्टावरच आधारित आहे. हे विसरून चालणार नाही.एकंदरीतच ग्रामीण साहित्य प्रवाहाचा विचार केला तर ग्राम लोकजीवनाचे आणि लोकसंस्कृतीचे अत्यंत संवेदनशील वर्णन आपल्याला ग्रामीण साहित्यामध्ये केलेले दिसून येते. त्याचबरोबर यंत्र संस्कृती, जागतिकीकरणाचे असहाय्य भाव देखील ग्रामीण साहित्याने वेळोवेळी व्यक्त केलेले आहेत.ग्रामीण मजूर, शेतकरी, कष्टकरी, गरिबीत दारिद्र्यात वाढणारा, उपासमारीत जगणारा शेतकरी, तर दुसरीकडे त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवणारी व्यवस्था याचेही प्रश्न साहित्यात वेळोवेळी मांडले गेलेले आहेत. निसर्गाचा नेहमी असणारा लपंडाव सांभाळत कृषी संस्कृती मध्ये शेतकरी कसा तग धरून उभा आहे .याचे चित्रण ग्रामीण साहित्य करताना दिसते.याच मानसिकतेतून जीवनात स्थिरता येण्यासाठी शेती आणि शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी ग्रामीण साहित्य भक्कमपणे उभे आहे.हे आवर्जून नमूद करावे लागते.

**निष्कर्ष :**

१) बदलत्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, कृषी व्यवस्थेचे परिणाम आणि त्याची नोंद ग्रामीण साहित्यातून वेळोवेळी घेतली गेलेली आहे.

२) जागतिकीकरणाचा कृषी संस्कृती वरील झालेला परिणाम याचा अचूक आढावा ग्रामीण साहित्य नेहमीच घेते.

३) नव्वदोत्तरी साहित्याच्या नवनिर्मितीत प्रकर्षाने आलेल्या समस्या आणि त्यावरील चर्चा वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम ग्रामीण साहित्याने केलेले आहे.

४) जागतिकीकरणाचे परिणाम कृषी संस्कृती वर झालेले दिसून येतात. झपाट्याने होणाऱ्या या बदलांमुळे जसे ग्रामीण कृषी संस्कृतीत परिवर्तन झाले आहे. तसेच शेतकऱ्यांचा बळीही या संस्कृतीने घेतलेला दिसून येतो.

५) शेती आणि शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्याच्या दृष्टीकोनातून ग्रामीण साहित्य आपल्याला सखोल अभ्यास करायला नक्कीच मदत करते.

संदर्भग्रंथ

१) प्रा. कुलकर्णी अरविंद वामन -महाराष्ट्र साहित्य पत्रिका, ग्रामीण साहित्य विशेषांक 2004, पृष्ठ क्रमांक 13.

२) पाटील मोहनः ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ति, जुलै 2002 पृ. 88.

३) प्रा.भोई ज्ञानेश्वरः जागतिकीकरणाचा मराठी भाषा व साहित्यावरील प्रभाव -संपा प्रा. डॉ. वासुदेव वले, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथमावृत्ती 2014 पृष्ठ क्रमांक 597

❑❑❑



Scanned with CamScanner